निशाणी क्र. २६

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पार्वती लिंबराज उलमुलगे

वय – ४५ वर्षे, व्यवसाय– घरकाम

पत्ता – वाकसा ता.निलंगा, जि.लातूर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.२२.०६.२०२३ रोजी सांयकाळी ०५.०० च्या सुमारास वाकसा येथे आमच्या घरासमोर घटना घडली होती. मी माझे पती आणि मुलगा आमच्या घराकडे जाण्यासाठी दगड–वाळूच्या सहाय्याने रस्ता करत होतो. तेंव्हा आरोपी क्र.१ ते ३ यांनी आम्हाला शिवीगाळ केली. माझे पती त्यांना शिवीगाळ करु नका दोरी टाकल्यानंतर जी जागा निघेल ती परत देवू असे म्हणाले. तेंव्हा आरोपी क्र.१ ने पडलेली काठी घेवून माझ्या पतीच्या डोक्यावर आणि डाव्या पायावर मारुन जखमी केले. मी आणि माझा मुलगा माझ्या पतीला सोडवण्यासाठी गेलो असता आम्हाला आरोपी क्र.१ ते ३ यांनी शिवीगाळ करुन लाथा–बुक्यांनी मारहाण केली. आरोपी क्र.१ ने आम्हाला, "परत आमच्या नादाला लागलात तर तुमचे तुकडे करु" अशी धमकी दिली. सारिका उलमुलगे आणि विजयकुमार उलमुलगे यांनी सोडवासोडव केली. माझ्या पतीला मारहाण करण्यासाठी वापरलेली काठी दाखवल्यास मी ओळखू शकते. (आत्ता मला प्रस्तूत कामातील जप्त मुद्देमाल एम.आर. नंबर ३९/२०२५ वरील जप्त काठी दाखवण्यात आली.) ती तीच काठी आहे. आरोपी क्र.१ ते ३ यांना मी ओळखते. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत.

**उलटतपास करीता आरोपी व आरोपीच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.11.13 13:39:13 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक १२/११/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,न्यायालय क्र.१.

ठिकाण निलंगा. निलंगा, जिल्हा लातूर.